# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १७४ वा ❑ बुधवार दि.२७ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## इतकी क्रूरता येते कुठून?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

निर्दयी,क्रूरता, व कौर्य हे शब्द ऐकताच किंवा वाचताच अंगाचा थरकाप उडतो.मात्र काही लोकांमध्ये क्रूरता व निर्दयीपणा मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. काही हिंसक घटनांमधील क्रूरता बघून खरंच मनुष्य इतका क्रूर असू शकतो का? असा संशय यायला लागतो.कोणत्याही हिंसक गुन्ह्यातील वरच्या श्रेणीचा अपराध म्हणून क्रूरते कडे बघितले जाते.जगभरात, विशेषतः भारतात, प्राणी आणि मानवांबद्दल होणाऱ्या क्रूरतेच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. यात मनुष्याला व प्राण्यांना जिवंतपणी मारहाण करणे, त्यांना अपंग करणे, किंवा त्यांची काळजी न घेणे यासारख्या कृतींचा समावेश आहे.आपण क्रूरतेच्या पलीकडे जाऊन कार्य कर आहोत याची त्यांना काहीच वाटत नाही..उलट पोलिस स्टेशनला जाऊन गुन्हा केल्याची साक्ष देखील मोठ्या धीटपणे देतात.

जैविक, सामाजिक, संज्ञानात्मक (ज्ञानविषयक) आणि परिस्थितीजन्य (परिस्थितीवर आधारित) घटकांच्या संयोगातून हिंसा जन्माला येत असते.. हे घटक एकमेकांशी जोडलेले असून, आक्रमक स्वभाव, चुकीचे संगोपन, मानवी मेंदूतील रासायनिक असंतुलन, अनुवांशिक पूर्वस्थिती, तसेच गरिबी, ताणतणाव आणि सामाजिक दबावासारख्या बाह्य परिस्थितीमुळे हिंसाचार वाढू शकतो.

समाजात वाढत जाणाऱ्या क्रूरतेच्या घटना समाजमन लक्ष वेधून घेत आहे.वैवाहिक जीवनातील क्रूरता व निर्दयीपणा झपाट्याने वाढत आहे. समाजातला वाढता हिंसाचार सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करत आहे.

आज केवळ देशच नाही तर जगावरही हिंसाचार, युद्ध आणि आक्रमकतेचे वर्चस्व आहे. जेव्हा अशा अमानवी आणि क्रूर परिस्थिती समग्रपणे उद्भवतात तेव्हा त्याचे निराकरण देखील समग्रपणे करावे लागते. जेव्हा हिंसक परिस्थिती आणि मानसिकता प्रबळ असते तेव्हा अहिंसेचे मूल्य आपोआप वाढते. कोणत्याही प्रकारची हिंसा चांगली नसते. परंतु आश्चर्यकारक गोष्ट अशी आहे की आज लोक हिंसाचारामुळे सामाजिक अलगाव आणि एकाकीपणाचे बळी पडत आहेत. शिकागो विद्यापीठाने केलेल्या अलीकडील अभ्यासातही हे समोर आले आहे. हा अभ्यास शिकागोमधील ५०० प्रौढांच्या सर्वेक्षणावर आधारित आहे जे अशा ठिकाणी राहतात जिथे हिंसक गुन्हेगारीचे प्रमाण जास्त आहे. हिंसाचाराचा वाढता परिणाम मानवी जाणीवेशी खेळतो आणि व्यक्ती असहाय्य वाटते हे तथ्य समोर आले. या परिस्थितीत असंवेदनशीलता वाढते आणि जीवन रडत असल्याचे दिसते.

उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडाची हुंडाबळीची घटना मन सून्न करणारी आहे.पतीने हुंड्यासाठी आपल्या पत्नीला जिवंत जाळल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना ग्रेटर नोएडाच्या सिरसा गावात घडली असून हुंड्याची मागणी पूर्ण न केल्याने पतीने विवाहित महिलेची निर्घृण हत्या करत तिला जाळून टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. मृत महिलेची ओळख निक्की अशी असून तिचा विवाह डिसेंबर २०१६ मध्ये विपिन नावाच्या व्यक्तीबरोबर झाला होता. दरम्यान, या घटनेनंतर ग्रेटर नोएडामध्ये एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान या प्रकरणात त्या तरुणाला अटक करण्यात आली आहे.त्याला पत्नीला मारल्याचा कोणताही पश्चाताप नाही.

वैवाहिक जीवनातील हिंसक घटनेचे अनेक प्रकार समोर येत आहे. त्याचप्रमाणे लहान मुलींसह स्त्रियांचे बलात्कार करून त्यांना जाळून टाकण्याचे प्रकार देखील मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

राजस्थानच्या भिलवाडा जिल्ह्यात गेल्या वर्षी २ ऑगस्ट रोजी ही संतापजनक घटना घडली होती. कालू आणि कान्हा अशी घटनेतील दोषींची नावे आहेत. १४ वर्षीय पीडित मुलगी शेळ्या चारण्यासाठी गेली होती. आरोपींनी तिचे अपहरण करून तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. त्यानंतर तिला प्रचंड मारहाण करण्यात आली. आरोपी एवढ्यावरच थांबले नाही, तर तिला कोळशाच्या भट्टीत जिवंत जाळून मारले. पोलिसांनी जवळपास राहणारे कालू आणि कान्हा यांना अटक केली होती.

एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिची जिवंत जाळून हत्या केल्याप्रकरणी दोन जणांना पोक्सो न्यायालयाने फाशीची शिक्षा ठोठाविली आहे. मुलीला न्याय मिळाला, अशी प्रतिक्रिया तिच्या आईवडिलांनी दिली.

मणिपूरमधील जिरीबाम जिल्ह्यात (७ नोव्हेंबर २०२४) रात्री धक्कादायक घटना घडली.येथे तीन मुलांची आई असणाऱ्या महिलेवर (वय ३१) अतिरेक्यांनी बलात्कार करून तिला जिवंत जाळलं. तसंच परिसरातील जवळपास २० घरांना आग लावली. आता पीडित महिलेचा शवविच्छेदन अहवाल आला असून, यामध्ये अनेक धक्कादायक खुलासे झालेत. पीडित महिलेच्या शवविच्छेदन अहवालानुसार, पीडितेला मारण्यापूर्वी तिच्या शरीराला खिळे ठोकण्यात आले होते. तिच्यावर अमानुषपणे बलात्कार करण्यात आला. त्यानंतर तिला जिवंत जाळण्यात आलं.

अशा कित्येक घटना कृतेच्या साक्ष देणाऱ्या आहेत.कोठून येतो हा इतका अमानुषपणा ? या आणि अश्या किती तरी बातम्या.सर्व समाजामध्ये हा क्रूरपणा वाढतो आहे का काही अपवादात्मक लोकांमध्ये हा अवगुण दिसू लागला आहे ?. मनुष्याचे जीवन इतके स्वस्त झाले आहे का ?जात, धर्म आणि इतर घटकांमुळे समाजात अविचारांना चालना मिळत आहे, ज्यामुळे अमानुष आणि क्रूर कृती घडत आहेत.मानवाधिकार कार्यकर्त्यांनी या क्रूर घटनांचा निषेध केला असून, समाज आणि सरकार यावर त्वरित लक्ष देण्याची गरज आहे. कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याची गरज आहे.समाजातील प्रत्येक वर्गाचे समुपदेशन करण्याची गरज आहे.

समाजातील लोकांनी एकत्र येऊन क्रूरता आणि अत्याचारांविरुद्ध आवाज उठवणे आवश्यक आहे.

# चिंबोरेयुद्ध कादंबरीला सांडू प्रतिष्ठानचा ''उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार'' जाहीर

ज्योतिर्मय साहित्य


**पुणे** – श्री दत्तात्रय कृष्ण सांडू प्रतिष्ठानतर्फे 'उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार' जाहीर केलेल्या बाळासाहेब लबडे यांच्या ''चिंबोरे युद्ध'' कादंबरीला 'रोख रक्कम ५,०००', सन्मानपत्र, आणि सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे. या कादंबरीत रूपकांच्या सुंदर बांधणीने समकालिन सामाजिक व राजकीय वास्तव उभे केले आहे. सध्याच्या समाजातील राजकीय परिस्थितीवर अतिशय मार्मिक व परखड भाष्यात भाष्य केले आहे.

या कादंबरीमध्ये स्वप्न, वास्तव आणि फॅन्टसी या तिन्ही घटकांचा एकत्रित वापर करून फ्रेम केलेली अनेक तर्हांमध्ये गुंतलेली कथा तयार करण्यात आली आहे.

बाळासाहेब लबडे यांनी खाडी परिसराखालील पाण्याच्या आतल्या जगाचे अद्वितीय चित्रण केले आहे, ज्यामुळे कलात्मक संघर्ष आणि राजकीय उलथापालथ यांचा सुंदर संगम मिळतो.

शासन, विरोध, अस्तित्व संघर्ष या सर्व सामाजिक–राजकीय पैलूंवर येणाऱ्या परिवर्तनांतून जाणाऱ्या व्यक्तीची मन:स्थिति व वर्तणूक यांचा समावेश या कादंबरीत आहे, ज्यात राजकीय श्रद्धा आणि नैतिक ताण–ताणलेले दृश्य उलगडते .या पुरस्काराचे वितरण नोव्हेंबर मध्ये मुंबईमध्ये मान्यवरांच्या हस्ते वितरण होणार आहे असे पुरस्काराचे आयोजक श्री आनंदकुमार सांडू यांनी जाहीर केले आहे. त्यांच्या या यशामुळे सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. या कादंबरीवर आत्तापर्यंत दिग्गज समीक्षकांनी समीक्षण केलेले आहे. यात ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त लेखक श्री दामोदर मावजो,

डॉ.दीपक बोरगावे, सुहासिनी कीर्तीकर, पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, दा गो काळे आदींचा समावेश आहे. या कादंबरीस चांदवडी रूपय्या वाड्मय पुरस्कार, नाशिक.कै.मारोतराव नारायणे उत्कृष्ठ कादंबरी पुरस्कार, वर्धा. स्मृतीशेष चमेली भाऊराव स्मृती उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार जळगाव असे आत्तापर्यंत पुरस्कार प्राप्त झाले आहेत. एबीपी माझा ने त्यांची स्वतंत्र मुलाखत ''आनंदाचे पान'' या सदरात प्रसारित केलेली आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या महाराष्ट्र टाइम्स, सामना, सकाळ, दैनिके व इतर नियतकालिकांमधून यावरील परीक्षणे प्रकाशित झालेली आहेत.त्यांच्या या यशामुळे सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.




# श्रीयश आयुर्वेदिक महाविद्यालयात नशा मुक्त भारत अभियान उत्साहात

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश आयुर्वेदिक महाविद्यालय व हॉस्पिटल रिसर्च सेंटर, छत्रपती संभाजीनगर येथे मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टीस अँड एम्पॉवरमेंट, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांच्या वतीने नशा मुक्त भारत अभियान उत्साहात राबविण्यात आले.

या अभियानात विद्यार्थ्यांचा सहभाग उल्लेखनीय राहिला. अभियानाच्या अनुषंगाने महाविद्यालयात भाषण स्पर्धा, गीत स्पर्धा, घोषवाक्य लेखन व पोस्टर मेकिंग स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या प्रभावी भाषणांतून नशेमुळे होणारे दुष्परिणाम अधोरेखित झाले, तर गीतांच्या माध्यमातून नशामुक्तीचा संदेश सुरेलतेने पोहचविण्यात आला.

तसेच विद्यार्थ्यांना नशामुक्तीविषयी जागृती करण्यासाठी लघुपटाचे प्रक्षेपण करण्यात आले. उपक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी नशा मुक्त भारत




अभियानाची प्रतिज्ञा घेतली. यानंतर महाविद्यालय परिसरात व सातारातांडा गावात विद्यार्थ्यांच्या जनजागृती रॅली काढण्यात आली.

या अभियानाचे प्रास्ताविक व सर्व उपक्रमांचे नियोजन डॉ. निवेदिता ताजने मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंदांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्वाती इटगी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना अमूल्य मार्गदर्शन केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांनी या अभियानात उत्साहाने सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरूळे यांनी प्राचार्या, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.



## आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.

7743918559
7743818559

॥ज्योतिर्मय॥
साहित्याचे विद्यापीठ

## सर्व साहित्यिकांसाठी खुशखबर!




आपल्या "ज्योतीर्मय 2025" दिवाळी अंकाचे काम सुरु झाले आहे व ज्यांना आपले साहित्य पाठवायचे असेल त्यांनी त्यांचे साहित्य माझ्या 7743818559 या व्हाटसपवर पाठवावे.

साहित्यासोबत आपले संपूर्ण नाव, पोस्टल ऍड्रेस (पिनकोड सहित) मोबाईल नंबर, पासपोर्ट साईज फोटो पाठविणे आवश्यक आहे.

दिवाळी अंकासाठी रु. 500/- माझ्या 7743918559 या नंबरवर फोन पे किंवा गूगल पे द्वारे पाठवावेत, ज्यांनी पैसे पाठविले त्यांचेच लेख, कविता, साहित्य दिवाळी अंकात समाविष्ठ केले जाईल. दिनांक 15 सप्टेंबर साहित्य स्वीकारण्याची शेवटची तारीख आहे या तारखेनंतर साहित्य स्वीकारले जाणार नाही. पेमेंट सुद्धा साहित्य पाठविताना जमा होणे आवश्यक आहे नंतर आलेले साहित्य घेतले जाईल याची शक्यता सांगता येणार नाही. कोणाला काही अडचण असल्यास माझ्याशी संपर्क करावा, (पैसे पाठविल्यानंतर मला त्याचा स्क्रीनशॉट पाठविणे आवश्यक आहे)

- संजय व्यापारी
संपादक, ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ

सूचना : ▪ दिवाळी अंक रजि. पोस्टाने प्रकाशना नंतर तीन दिवसात घरपोच येईल. ▪ साहित्य 600 शब्दांपर्यंत असावे. ▪ साहित्य जसेजसे येईल त्याप्रमाणे पेजेस सेट होतील. ▪ साहित्याचे विषय शक्यतो मनोरंजनात्मक असावेत. ▪ साहित्य स्वीकारणे किंवा नाही स्वीकारणे हे संपादक ठरवतील. ▪ प्रत्येक साहित्यिकाला प्रत्येकी एक लेख व एक कविता पाठवता येईल. फक्त कविता असल्यास दोन कविता पाठविता येतील. ▪ साहित्य पाठविताना दिवाळी अंकासाठी असे स्पष्ट मेन्शन करावे. ▪ दिवाळी अंकाबद्दल काही सूचना असतील तर मला 7743818559 या माझ्या व्हाट्सअप नंबरवर पाठवाव्यात.

दिवाळी अंकासाठी काही विषय देण्यात येत आहेत त्या विषयावर किंवा इतर कोणत्याही विषयावर लेख चालेल. ▪ लेखासाठी विषय - 1. सण- उत्सवाचे बदलते स्वरूप. 2. आपली संस्कृती जपा. 3. संपत चाललेला संवाद आणि परिणाम. 4. आमच्या काळातील दिवाळी. 5. फास्ट फूड किती घातक. 6. परत अध्यात्माकडे... 7. आज्जी- आजोबांच्या गोष्टी हरवल्या... 8. आरोग्य किती महत्वाचे. 9. नवीन रेसिपीज. 10. मोबाईलचे चांगले व वाईट परिणाम.

Wing B3, Flat 701, WHISTLING PALMS CHS,Mankar Chowk, Kaspate Wasti, Wakad, Pimpri-Chinchwad, Maharashtra 411057
jyotirmaysahitya@gmail.com https://jyotirmaysahitya.com

## वास्तुशास्त्र पेंटींग



लघुलेख - 27

आपल्या लघुलेखांतील, आज आपण, राशीचक्रा मधील अखेरची राशी "मीन" बद्दल माहिती घेणार आहोत.

'मीन' रास असणाऱ्या व्यक्तीने जर वास्तु -कंपनी -इंडस्ट्री वा एखादा उद्योग-व्यवसाय सुरु करायचं ठरवलं वा खरेदी करायचं ठरवलं तर, त्यासाठी त्याच्या "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये कोणकोणते घटक हे लाभदायक असतात ? ह्या बद्दल माहिती जाणून घेवुया...

"मीन" राशी ही जलतत्त्वाची आहे. "जल तत्वाची राशी" असून देखील या राशीचा प्रभावी रंग "पिवळा" आहे. खूपदा असा समज असतो की, जलतत्व आहे म्हणजे निळा रंग असेल. परंतु तसे नाही.

ही व्यक्ती धार्मिक आणि अध्यात्मिक वृत्तीची असते. राशी स्वामी 'गुरु' आहे तर या राशीचा आराध्य वृक्ष 'वड' आहे. या राशीत जन्म झालेल्या जातकाचे जन्मनक्षत्र 'उत्तरा भाद्रपदा' किंवा "रेवती" या पैकी असते. या नक्षत्रांचे आराध्यवृत्त अनुक्रमे "कडुनिंब आणि "मोह" आहेत. या नक्षत्रांच्या देवत्ता अनुक्रमे "अहिर्बुधन्य" आणि "पुषा" आहेत.

वरिल महत्त्वाचा तपशील विचारात घेवून मीन राशीच्या जातकाने आवश्यक त्या इतर माहिती नुसार "वास्तुशास्त्र पेंटींग" बनवून स्वतःच्या वास्तुमध्ये वा व्यवसायाच्या जागी स्थापित केले तर होऊ घातलेले लाभ जर एक वर्षानंतर होणार असतील तर ते सदर "पेंटींग" मुळे अशा व्यक्तींना दोन ते तीन महिन्यांतच होऊ शकतात.

जलाशयाचा प्रभाव असणारे पेंटींग, त्यात त्या, व्यक्तीच्या वैयक्तिक, कौटुंबिक आणि वास्तु विषयक माहितीच्या तपशीलाची रंगांकारांसह, प्रतिकांचा, जपाक्षरांचा संदर्भ "चित्रविषय" म्हणून सदर 'वास्तुशास्त्र पेंटींग"मध्ये येतो तेव्हा, ते 'पेटींग', मीन राशीच्या व्यक्तीचे हितचिंतक बनते. कौटुंबिक वाद, भाऊबंदकी, द्वेष करणारे आणि स्पर्धक मंडळी या सार्यांवर प्रभावी ठरते हे पेंटींग..!! कारण, कलीयुगात "रंगदेवता" ही प्रभावीपणे कार्य करीत आहे.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......

बहिण जाऊ केली
वाड्या नाही आली
पिकेलं पानाची
पेटारी वाया गेली ||२२७||

गावाच्या गावात
सखु बहिणीचं घर
खांद्यावर कुची (टोपड)
बाळ करे येरझार ||२२८||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## मोल

**ज्योतिर्मय साहित्य**

हा प्रसंग आपल्याला जणू सांगतो देवाजवळ जातीपातीचे बंधन नसते. उच्च नीच, लहानथोर असे कुठलंही बंधन नसतं.

जातीपातीच्या भिंती तर आपणच उभ्या केल्या आहेत. मानवाने उभ्या केलेल्या या भिंती परमेश्वरापुढे निरर्थक आहेत. त्याला फक्त भोळा भाव, भक्ती प्रिय आहे.

म्हणूनच त्या म्हातारीची भक्ती, तिचा विश्वास फळाला आला.

गावाने तिला नाकारले पण परमेश्वराने स्वतः तिच्या टोपलीतील फळे स्वीकारली. तिला आईचा मान दिला. तिचे जीवन कृतार्थ झाले.

हीच खरी भक्तीची कमाई.

परमेश्वरापुढे केवळ श्रद्धेचे मोल असते. सोने नाणे, पैसे अडका, उच्च नीच यासारख्या गोष्टी त्याच्यापुढे व्यर्थ ठरतात.

गोपिकाही कृष्णाकडून काहीच घेत नव्हत्या. उलट त्या त्याला दही, दूध, लोणी देत होत्या. त्यांच्याजवळ समर्पण भाव होता.

त्यांच्या भक्तीत ''देणं'' होतं, ''घेणं'' नव्हतं.

यातच खऱ्या मोलाची व्याख्या दिसते. आपण सर्वसामान्य माणसं ! आपल्याला घेणं माहिती असतं परंतु देणं फार कमी !

आजच्या दिवसात खरं निरपेक्ष प्रेम दुर्मिळ होत चाललं आहे. आज आपण प्रत्येक नातं, प्रत्येक कृती पैशात मोजतो.

आईच्या मायेचं मोल काय?


मित्राच्या आधाराचं मोल काय?

देशासाठी लढणाऱ्या सैनिकाच्या प्राणांचं मोल करता येईल ?

प्रेमाचा, करुणेचा, सन्मानाचा दर लावता येईल का?

कृष्णाच्या या छोट्याशा प्रसंगातून आपल्याला जाणवतं खरं मोल हे भावनेचं, भक्तीचं, नि:स्वार्थ देणगीचं असतं.

### उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२



देवासाठी आणि जीवनासाठीही.

मोल म्हणजे पैशाने विकत घेता न येणारी ती आत्मीयता.

कारण खरं मोल हे कधीच नाण्यांच्या खणखणाटात नसतं, ते असतं माणसाच्या हृदयातल्या नि:स्वार्थ भावनेत..

मोल नेहमीच पैशांत नसतं! पैशात ते करता येतही नाही.

मोल जो जाणेल त्याच्यासाठी असतं.

ते आईच्या डोळ्यातल्या पाण्यात असतं.

ते मित्राच्या खांद्यावरच्या आधारात असतं.

ते भुकेल्याला दिलेल्या अन्नात आणि त्याच्या चेहऱ्यावर झळकणाऱ्या तृप्ततेत असतं.

ते मनुष्यत्वाच्या स्पर्शात असतं. धीराच्या शब्दात असतं.

प्रेमळ, आश्वासक स्पर्शाचे कधी मोल करता येईल का ?

कुसुमाग्रजांच्या कणा कवितेतील पाठीवर आधाराचा हात ठेवून लढणाऱ्या गुरुजींच्या आश्वासक स्पर्शाचं मोल होऊ शकेल का ?

जगाच्या पाठीवर या चित्रपटात एक सुंदर गाणं आहे. सिद्धहस्त कवी ग दि माडगूळकर यांचे शब्द आहेत. आशा भोसले आणि सुधीर फडके यांच्या अजरामर स्वरात हे गाणं आपल्याला ऐकायला मिळतं. **(क्रमशः)**



### दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## शुध्दज्ञान निरूपण


**ज्योतिर्मय साहित्य**

जे आत्मज्ञान वेदशास्त्राचे तात्पर्य आहे. जे योग्य प्रमाणांनी निश्चित केलेला निर्णय आहे. जे साक्षात अनुभवायला येते,आणि जे सूक्ष्म विचारांती योग्य ठरते, जे आत्मज्ञान श्रद्धावंतांना त्यांच्या भाग्याप्रमाणे प्राप्त होते. असे ज्ञानवंत आत्मज्ञानी आतापर्यंत झाले व यापुढे होत रहातील समाजाला सन्मार्गाला लावतील यात नाममात्र संदेह नाही. आणि भारताचीही फार मोठी अनमोल देणगी आहे. जगातील कुठल्याही देशात तुम्हाला ती बघायला मिळणार नाही.

मित्रांनो सर्व ज्ञानांचे शिखर म्हणजे आत्मज्ञान होय.जर तुमच्या वर सद्गुरूंचा आशिर्वादाचा हात असेल तर विनासायास प्राप्त होतो.सद्गुरूंचे वचन हेच आत्मज्ञानाच्या बाबतींत परमश्रेष्ठ समजावे. स्वतः वर गुरूंचा आशिर्वाद असल्यावर आत्मज्ञान होते त्यासाठी समर्थ सांगतात की, संस्कृत ग्रंथांत काय आहे ते आपण पाहिले नाही, मराठी ग्रंथ कधीच वाचले नाहीत, पण आपल्या हृदयाच्या कप्प्यात सद्गुरूंचा वास कायम आहे. मग आपल्याला संस्कृत व प्राकृत ग्रंथांची गरज तरी काय आहे. माझ्या कडे स्वामींचा वरदहस्त कायमचा आहे. वेदांचा अभ्यास न करता किंवा श्रवणयाग न करता मला अगदी विनासायास प्रयत्नावाचून गोड सद्गुरूचा आशिर्वाद मिळाला आहे. मराठी ग्रंथतर श्रेष्ठ आहेच. पण त्यापेक्षा संस्कृत ग्रंथ जास्त श्रेष्ठ आहेत कारण संस्कृत भाषा ही ''देववाणी'' भाषा आहे. वेदांच्या पेक्षा श्रेष्ठ काहीच नाही. कारण वेदांचे सारें रहस्य वेदांतामध्ये प्रगट झालेले आहे.

अशा वेदांताच्या जो तात्पर्यार्थ आहे आणि जो अत्यंत खोल परमार्थ आहे . अतिशय खोल आणि अर्थगंभीर असे जर काही असेल तर तेसद्गुरूंचे वचन होय.

**(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नाम-रूपाचा संबंध !

**ज्योतिर्मय साहित्य**

नाम घेत असताना रूपाचे ध्यान आवश्यक आहे का ? वास्तविक, नाम आणि रूप ही भिन्न नाहीतच. पण नाम हे रूपाच्या आधीही असते आणि नंतरही उरते. नाम रूपाला व्यापून असते. राम जन्माला येण्यापूर्वी वाल्मीकींनी रामायण लिहिले, आणि रामाने मागाहून जन्म घेऊन त्यात वर्णन केल्याप्रमाणे आचरण करून दाखविले. म्हणजे रूप अस्तित्वात येण्यापूर्वी नाम होते, आणि रूप गेल्यानंतर आजही नाम शिल्लक आहे. देशकालाच्या पलीकडे जे कायम टिकते ते सत्य होय. प्रत्यक्ष आकाराला आलेली अनेक रूपे नाहीशी झाली तरी त्यांचे नाव टिकून राहते. म्हणजे नाम हे देशकालाच्या मर्यादेच्या पलीकडे असते; म्हणजे ते रूपापेक्षा जास्त सत्य असते. जे सत्य आहे ते श्रेष्ठ असलेच पाहिजे. तेव्हा नाम घेणे ही गोष्ट मुख्य आहे. ते घेत असताना रूपाचेही ध्यान राहिले तर उत्तमच; पण ते तसे न राहिले, तरी नाम घेत असताना रूपाचे स्मरण सूक्ष्मरूपाने असतेच असते. समजा, एका गृहस्थाच्या घरी राम नावाचा गडी आहे. तो गृहस्थ ' राम राम ' असा जप करीत बसला आहे, पण त्याचे लक्ष राम-रूपाकडे नाही, मनात काहीतरी दुसरेच विचार चालू आहेत. अशा वेळी त्याला जर एकदम विचारले की, ' तुम्ही कुणाचे नाव घेत आहात ? ' तर अर्थात् 'रामाचे', असेच उत्तर तो देईल. हे उत्तर देताना त्याच्या मनात ' दाशरथी राम ' हीच व्यक्ती असणार, ' राम गडी ' ही व्यक्ती नसणार. याचाच अर्थ असा की, नाम घेत असताना रूपाचे ध्यान सूक्ष्मरूपाने आत जागृत असते. म्हणूनच, रूप ध्यानी येत नाही म्हणून अडून बसू नये. नामस्मरण करण्याचा अट्टाहास ठेवावा, त्यात सर्व काही येते.

एखाद्या माणसाची आणि आपली ओळख असेल तर पहिल्याने त्याचे रूप पुढे येते आणि नंतर नाम येते. पण आपली त्याची ओळख नसेल, आणि आपण त्याला बघितलेला नसेल, तर त्याचे फक्त नाव येते. आज आपल्याला भगवंताची ओळख नाही, म्हणून त्याचे रूप माहिती नाही; परंतु आपल्याला त्याचे नाम घेता येईल. सध्यासुद्धा, त्याचे नाम घेताना त्याची आठवण आपल्याला होते हा आपला अनुभव आहेच. भगवंताचे रूप तरी निश्चीत कुठे आहे ? एक राम ' काळा ' तर एक राम ' गोरा ' असतो; एक राम 'लहान' तर एक ' मोठा ' असतो; पण सर्व रूपे एका रामाचीच असतात. भगवंत स्वत: अरूप आहे; म्हणून जे रूप आपण त्याला द्यावे तेच त्याचे रूप असते. यासाठी आपण कोणत्याही रूपामध्ये त्याचे ध्यान केले तरी चालते. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. म्हणून भगवंताचे नाम श्रेष्ठ आहे. हे त्याचे नाम तुम्ही आवडीने, अखंड घ्या आणि आनंदात रहा.

६. दानात दान अन्नदान, उपासनेत उपासना सगुणाची उपासना, आणि साधनात साधन नामस्मरण.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

**ज्योतिर्मय साहित्य**

मनाचा मृत्यू म्हणजे समाधी ही व्याख्या आपण पूर्वी ऐकलेली आहे ज्यावेळेस प्राण उर्ध्वगामी होतो मन जवळपास संपल्यात जमा असते मी तू पणाची जाणीव उरतच नाही बुद्धीही कुंठीत होते आणि अहंकार लीन असतो त्यावेळेसच अविद्येचे मळभ संपल्या जाते. सूक्ष्म स्तरावरील विकारांचे जमाव नष्ट केले जातात. योगाग्नीने शरीरात अग्नि तांडव सुरू केलेले असते. यामध्ये पापांची किल्मिशे जळून भस्म होतात. मन निष्पन्द असते. जाणीव तर असते पण ती कोणाला येते याविषयी शब्दात मांडणे अवघड जाते. अशा वेळेस आत्मा पुन्हा तेजपुंज स्वरूपात बुद्धीवर प्रकाश टाकतो म्हणून हृदयस्त परमात्मा म्हणजेच आत्मा हा तेजोमय रीतीने लकाकला आहे, त्या तेजाचे वर्णन ज्ञानेश्वर माऊली येथे असे करीत आहेत.

साकार निराकार शून्या शून्य दिठा
रुपी रूप वाटा हरी माझा

साधनेच्या निम्नस्तरावर भगवंताचे सगूण रुप दर्शन होत असते. या सगुणाच्या दर्शनानंतर त्याची साधना निर्गुण निराकार परमात्म्याच्या अनुभव घेण्यासाठी पुढे सरकते. यानंतर ज्ञानप्राप्ती म्हणजेच आत्म्याचा अनुभव येतो. हा निर्गुण निराकार परमात्म्याचा अनुभव आहे. आत्मा व परमात्मा हे एकच आहेत हे आता जाणवते.

ही साधना ज्ञानानंतर पुढे सविकल्प समाधी चा अभ्यास दृढ करून नंतर निर्वी कल्प समाधीकडे झेप घेते. या निर्वी कल्प समाधीत एक उच्चतम अनुभव आहे. तो म्हणजे महा शून्याचा. हा महा शून्याचा अनुभव, करोडो करोडो लोकांमधून एखाद्याच भाग्यवंतास अनुभवता येतो.

आपल्या भोवती काहीही नाही. केवळ निर्वात पोकळी आहे. खूप अंधकार दाटलेला आहे. या पोकळीचा आदी अंत कुठेच लागत नाही.हे केवळ जाणवते. पण देह भावांना पूर्णपणे संपलेली असते. मन हे जवळपास मेल्यात जमा असते. विचार नसतातच फक्त या निर्वात पोकळीचा अनुभव घेणारा कोणीतरी आहे. त्यास अनुभव येत आहेत असे भासते. ही समाधीची प्रगाढ अवस्था आहे. यात साधक बऱ्याच वेळेस बाहेर कसे पडावे हे त्याला कळत नाही. या समाधीत अखंड अमर्याद महानंद मिळत असतो.

सर्वत्र अंधकार दाटला आहे. निर्वात पोकळी आहे, आणि काहीही नाही हा निर्गुण निराकार परमात्म्याचा प्रत्यक्ष अनुभव असतो.अनाहत नादाच्या साथीने सद्गुरु शिष्यास यातून बाह्य जगतात परत आणतात व लोक कल्याणाची कामे करण्यासाठी त्यास उपदेश करतात.

तुज सगुण म्हणू की निर्गुण रे
सगुण निर्गुण एक गोविंद रे

हा सगुणा पासून निर्गुणा पर्यंत आणि निर्गुणात येताच महा शून्याचा महानुभव माऊलींनी घेतला व त्यांचा आत्मा हाच परमात्मा आहे यांचे विषयी त्यांचा निश्चय झाला. ही अवस्था त्यांच्या असा साधनेने परिपुष्ट झाली व त्यांच्या उपादेय हृदयात रखुमाईचा पती तो परमात्मा स्थिर झाला. हा परमात्मा अनेकांना केवळ मुर्तीतच

आहे असे वाटते ही उफराटी कळा म्हणजे चुकीची बाजू आहे असे माऊली म्हणतात.

असे अनुभव जेंव्हा मनात शब्दच नाहीत अशा अवस्थेत मांडले आहेत. हे कोणत्या शब्दात मांडता येतील हे किती कठीण काम आहे ?तरीही माऊलींचे सामर्थ्य इतके की त्यांनी चपखल शब्दात हे दिव्य अनुभव मांडलेले आहेत.

या ज्ञानियांच्या राजास गुरु, महाराजांस विनम्रपणे अभिवादन करून हा लेख इथे संपवितो.

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

४६. माय सरस्वती

मूर्ती साजिरी गोजिरी। हास्य प्रसन्न निर्मल।
माय बसे हंसावरी। आसनी श्वेत कमल।।
हंसारूढ सरस्वती। ग्रंथजपमाळ हाती।
सत्वप्रधाना मूरती। माय ब्रह्मविद्या देती।।
मयूरवाहना शारदा। वीणा शोभे अंकावरी।
सर्वकलांची देवता। भक्ते यशवर्षा करी।।
चंद्रहास मुका बाल। कृपा करे सरस्वती।
चंद्रहास गं वाचाल। माय वसे रसवन्ती।।

४७. माय लक्ष्मी

रत्नाकराची दुहिता। नारायणाची वल्लभा।
लक्ष्मीनामे गं प्रसिद्धा। माये वंदावे प्रारंभा।।
आसनी रक्त कमल। गती प्रसिद्ध चंचल।
आळत्याने पाय लाल। नयन ते निलोत्पल।।
माये येता गं सुंदर। माये जाता गं दरिद्र।
जुळवोनी दोहो कर। अष्टस्तव करी इंद्र।।
वेद गाती सूक्त तुझे। हिरण्मयी रमा राजे।
चंद्रहास करी अर्जे। रहावे घरी माझे।।



## आरोग्य संजीवनी

### कशी घ्यावी डोळ्यांची काळजी.....

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रवासामध्ये वाचू नये.

अपुऱ्या प्रकाशात लिहिणे, वाचणे इ. गोष्टी करणे टाळावे.

अति प्रखर प्रकाशाकडे अधिक वेळ पाहू नये. सूर्यकिरणांपासून डोळ्यांच्या रेटिनावर गंभीर परिणाम होवू शकतो, तेव्हा काळा गॉगल प्रखर उन्हात वापरा.

सुर्यग्रहण उघड्या डोळ्यांनी पाहू नये.

पित्तवर्धक आहार उदा. अतितिखट, खारट, उष्ण, मसालेदार, चमचमीत, तेलकट पदार्थ अधिक खाऊ नयेत.

डोळ्यांसाठी वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक उत्पादनाची पाहणी करावी. क्लिनिंग सोल्युशन, कॉन्टॅक्ट लेन्सेस आमि आय ड्रप्स यांची एक्सपायरी डेट तपासून घ्यावी. कॉन्टॅक्स लेन्स वापरताना अधिक काळजी घ्यावा.

डोळ्यांना सूज अथवा डोळयांखाली काळी वर्तुळे आल्यास चंदन आणि जायफळाची पेस्ट डोळ्यांभोवती रात्री लावून ठेवा. सकाळी धुऊन टाका. यामुळे डोळ्यांना गारवा मिळून त्याखालील काळी वर्तुळे नाहीशी होतील. अथवा टोमॅटो आणि लिंबाचा रस डोळ्यांच्या खाली लावून तो सुखल्यावर चेहरा धुवून घ्यावा. नियमित असे केल्याने डोळ्याखालची वर्तुळे हळू-हळू कमी होतात. तसेच बदामाच्या तेलाने जवळपास २० मिनिटे डोळ्यांभोवती मसाज करावा, पुदीन्याचा रस लावल्यानेही काळी वर्तुळे कमी होतात, काकडीच्या किंवा बटाटयाच्या चकत्या डोळ्यांवर ठेवल्यामुळे डोळ्याखालील फ ुगीरपणा सूज कमी होऊन तिथली त्वचा ताजीतवानी होते.

काकडीचा रस काढा आणि तो चेहऱ्याला लावा किंवा तो थोडा असेल तर तो डोळ्याभोवती लावा. दहा ते पंधरा मिनिटे त्याठिकाणी ठेवा आणि पंधरा मिनिटांनी धुवून टाका. त्यामुळे डोळ्यावरचा ताण कमी होईल. हाच काकडीचा रस बटाट्याच्या रसात मिसळून तो चेहऱ्याला लावून असाच दहा पंधरा मिनिटे ठेवून तो स्वच्छ पाण्याने धुवावा. त्याने काळी वर्तुळे तर जातातच परंतु काही कारणांनी चेहऱ्याला सूज आली असेल तर ती सूज उतरण्याससुध्दा मदत होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

डोळे लाल झाले असल्यास किंवा डोळ्यांविषयी काही तक्रार असल्यास सातत्याने ड्रॉप्सचा वापर करू नये, असं केल्याने अनेकवेळा त्याचे उलट परिणाम होऊ शकतात.

डोळ्यांच्या आरोग्यासाठी व्यायामालाही महत्त्व आहे. डोळ्यांचे दोन महत्त्वाचे व्यायाम आपण घरच्या घरीही करू शकतो.

१) एका पुठ्ठ्यावर काळा ठिपका काढावा. त्याकडे एकटक पाहावे. असे केल्याने दृष्टी सुधारतेच; पण मनही एकाग्र होते.

२) काळा ठिपका पुठ्ठ्यावर काढून पुठ्ठा गोल फिरवावा व ठिपक्याकडे एकटक पाहावे. असे करताना बुबळे फिरतील व डोळ्यांचा व्यायाम चांगला होईल. या व्यायामांच्या माध्यमातून डोळ्यांभोवती असलेल्या आठ स्नायूंची क्षमता वाढवता येते.

डोळ्यांना निरोगी ठेवण्यासाठी नेहमी हिरवा भाजीपाला आहार मध्ये समाविष्ट करावा. डोळ्यांची काळजी घेण्यासाठी विटामिन भरपूर असलेले पदार्थ आहारामध्ये खावे. आहार संतुलित असायला हवा. संतुलित आहाराने डोळ्यांचे विकार होत नाही.

नेत्रतज्ञांच्या सल्ल्याशिवाय डोळ्यात कशाचाही रस घालू नये अथवा ड्रॉप्स टाकू नये .

***

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**

आपली जिथे अडचण होते तिथे बसून राहू नये. आपल्या अस्तित्वाचा जिथे प्रश्न असतो तिथे आपले अस्तित्व सिद्ध करीत बसू नये. माणसाने विचारल्या शिवाय सल्ला देऊ नये. संतांना विचारणा शिवायही सल्ला देऊ शकतात. अन्यायाने विचारले तरी सांगू नये. जिथे आपल्या शब्दाला किंमत नाही तिथे राहू नये.ही कारण आली बिभीषण ठरवितो तर रामाला शरण जावे. त्याने असा विचार केला असेल की भाऊ असून तो घरभेदी ती असे वाटलेच असेन.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

म्हणून रामाला भक्त म्हणून भेटायचे. प्रत्यक्ष युद्धात सहयोग करू नये पण रामाणी सल्ला मागितला तर तो मात्र द्यावा.

रावणाने मंदोदरी सीतेला समजाविण्या साठी पाठविले.पण उपयोग झाला नाही.

रामाच्या हेरांनी बिभीषण येणार हे सांगितले. कांहीं योद्धे म्हणाले की हा रावणाचा भाऊ आहे तोही मायावी असेल.तो कदाचित आपल्या कडून बातम्या काढून रावणाला सहकार्य करेल.सुग्रीवही त्याला घेण्यास अनुकूल नव्हता. सर्वांचे बोलणे ऐकून राम म्हणाले हनुमान विचारा.कारण त्यास ज्ञान बरोबर हनुमानास अनुभव आहे.

हनुमान म्हणाले तो शरण येत असेल तर नक्की त्यास शरण घ्या.

शेवटी राम म्हणाले अरे जरी रावण प्रत्यक्ष शरण आला तरी त्यास मी स्वीकारील हा तर बिभीषण आहे.

**(क्रमशः)**




# एका डोळ्याची झोप



ज्योतिर्मय साहित्य

''रात्री बारा वाजून गेले तरी माझा डोळा काही लागलाच नाही...'' मी सहज बोलता बोलता म्हटलं आणि नेहमीसारख्या कृष्णाच्या शंका सुरू!

''डोळा लागला नाही... म्हणजे?'' त्याने विचारले.''म्हणजे झोप आली नाही रे.'' माझं हे उत्तर ऐकून तो मोठमोठ्याने हसला

''आई, तू एकदम फनी आहेस!'' मी चमकलेच. ''का रे बाबा?''

''एकतर तू मला बाबा म्हणतेस, आणि मी तुझा बाबा नाही आणि वर म्हणतेस, डोळा लागला नाही. म्हणजे तू एकाच डोळ्याने झोपतेस वाटतं!'' हे ऐकून मी गोंधळलेच. पण कृष्णाचं भाषाशास्त्र सुरूच राहिलं,


''आई, जर दोन्ही डोळे मिटले नसते तर तू म्हणाली असतीस डोळे लागले नाहीत. पण तू म्हणालीस डोळा लागला नाही. म्हणजे तू एका डोळ्यानं झोपतेस वाटतं!'' मी थक्क! हा पोरगा खरंच इतका बारकाईने भाषेचा अर्थ शोधतोय की फक्त माझा गोंधळ उडवतोय?

''अरे बाळा, 'डोळा लागणे' ही म्हण आहे, त्याचा झोप येण्याशी काही संबंध आहे. दोन्ही डोळे उघडे राहिले म्हणून झोप नाही आली असं म्हणायचं असतं.'' ''म्हणजे म्हणी खोटं बोलतात का?'' त्याचा नवा पेच!

आपण इथेच थांबू या. कारण कृष्णासारख्या लहान मुलांच्या असं का? या प्रश्नांमागे केवळ निरागस शंका नसते, तर भाषेचं कठीण कोडंही असतं.

'डोळा लागणे' हा वाक्प्रचार आहे, हे आपल्याला सहज समजतं . पण भाषेतील म्हणी, वाक्प्रचार, रूपकं यांचा अर्थ बालमनासाठी स्पष्ट असतोच असं नाही.

''डोळा लागला'' म्हणजे झोप लागली हे आपण समजतो, पण ''डोळा लागला'' म्हणजे ''डोळा दुखावला गेला'' असा अर्थदेखील निघतो की! बालमनाच्या दृष्टीने हे सगळं गोंधळात टाकणारं. भाषेतील असे वाक्प्रचार अनेकदा लाक्षणिक अर्थाने वापरले जातात. 'त्याचा डोळा लागला' म्हणजे कुणाची दृष्ट लागली, असाही एक अर्थ असेल का? मी खूपच गोंधळात पडले होते. त्याच्या प्रश्नामुळे मी गोंधळात पडले की त्याच्या चेहऱ्यावर विलक्षण आनंद दिसायचा. अजूनही तसंच आहे. माझ्यासारखे अनेक पालक गोंधळात पडूच शकतात मग आता याचा खरा अर्थ लहान मुलांनी कसा समजायचा? इथूनच पालकत्वाचं खरं



सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

आव्हान सुरू होतं. आपण सहज बोलून जातो, पण लहान मुलं ते शब्दशः घेतात. त्यांच्या अनेक शंका शब्दांभोवती फिरत राहतात आणि आपणच कधी वैतागतो, कधी हसतो. तर कधी गमतीने हसून विषय टाळतो


''बाबा, तू झोप'' असं मी म्हटलं खरं पण माझ्या या झोप म्हणण्यात खरंतर त्याच्या प्रश्नापासून दूर पळणं होतं, त्याला टाळणं होतं म्हणून मी त्याला नुसतं झोप असं नाही म्हटलं. मी म्हटलं, ''दोन्ही डोळ्यांनी झोप. उगाच अर्थकारण करू नकोस!''


या सदरात लिहिण्याच्या निमित्ताने मी या घटनेचं मनोविश्लेषण मांडलं तेव्हा माझ्या लक्षात आलं की आपण त्याला तेव्हाच सांगायला हवं होतं की

'अरे बाळा, भाषा म्हणजे फक्त शब्दांचा खेळ नाही. ती अनुभवांची मांडणी आहे.' मुलांना म्हणींचा अर्थ सांगताना आपण आपल्या अनुभवांच्या आधाराने ते पटवून सांगायला हवेत. काही क्षणांनी त्याने विचार करुन मला परत प्रश्न विचारला,

''आई, आता तरी झोप येईल का? म्हणजे एक तरी डोळा लागतोय का, बघ बरं'' आणि त्याबरोबर माझ्या चेहऱ्यावर थोडं हसू, थोडा गोंधळ आणि खूप माया, कौतुक अशा संमिश्र भावनांची गर्दी जमली. मी अचानक माझ्या बालपणीच्या आठवणीत रमले. मला जेव्हा अभ्यासक्रमात म्हणी, वाक्प्रचार शिकवले गेले तेव्हा तो माझा सगळ्यात आवडता प्रकार होता. नवनवीन म्हणी, वाक्प्रचार शोधणं त्यांचे अर्थ जाणून घेणं, वाक्यात उपयोग करणं, म्हणींवरुन गोष्ट तयार करणं हा मला छंदच जडला होता आणि असंच एकदा म्हणींचा संग्रह चाळत असताना एक म्हण वाचनात आली. पाण्यात पडलं की पोहता येतं. मला नवल वाटलं. ही म्हण जर खरी असेल तर माणसं पाण्यात बुडली का असती? मला काही या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. मग अशा म्हणी शोधण्याचा प्रयत्न मी करु लागले. पुढच्यास ठेच मागचा शहाणा. आहे का हो खरंच असं? पुढच्याच्या अनुभवावरून होतो का मागचा शहाणा? याचप्रमाणे आणखी एक म्हण मला आठवली 'करुन करुन भागली आणि देव मार्गाला लागली ' ज्या अर्थाने ही म्हण वापरली जाते तसं बघितलं तर मग अनेकदा चुकलेल्या माणसानं सुधारायचं नाहीच का? सुधारण्याचे मार्गच बंद करतो ना आपण अशी म्हण वापरुन?

**(क्रमशः)**





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

## मैत्रीपर्व : गुरुदेव, स्वामी विवेकानंद आणि योगी अरविंद

पुढे त्यांनी वंदेमातरम या इंग्रजी दैनिकाचे संपादन केले आणि विविध विषयांवर लेखन करून बंगाली तरुणांमध्ये नवचैतन्य जागृत करण्याचे कार्य केले. त्यांचा कोणताही गुन्हा नसताना इंग्रजांनी त्यांना एका बॉम्ब हल्ल्याच्या खटल्यात गोवले होते. त्यातून दोषमुक्त झाल्यानंतर ते परागंदा झाले. पण ते पळून वगैरे गेले नव्हते तर त्यांनी पाँडेचेरीला प्रयाण केले आणि तेथे जवळपास ४० वर्षे योगसाधना केली आणि त्यातून अध्यात्मातील एका उच्च अवस्थेपर्यंत त्यांचा प्रवास झाला. इथेच गुरुदेवांची आणि त्यांची पुन्हा भेट झाली यावेळी गुरुदेव परदेश दौऱ्यासाठी निघाले होते परंतु त्यांची तब्येत बिघडल्यामुळे त्यांनी विश्रांती घेण्याचे ठरवले आणि त्यादरम्यान योगी अरविंद यांची भेट घेण्याचे निश्चित केले. त्या काळात योगी अरविंद आपल्या ध्यान साधनेमुळे कोणालाही भेटत नव्हते. योगी अरविंद यांच्या फ्रेंच शिष्य मीरा अल्फासा त्यावेळी आश्रमाचे काम पाहत होत्या. त्यांना माताजी म्हणून सर्व ओळखत होते. गुरुदेवांनी त्यांच्याशी संपर्क साधला आणि योगी अरविंद यांच्या भेटीची विनंती केली. रवींद्रनाथ आपली भेट घेऊ इच्छित आहेत हे कळल्यानंतर योगी अरविंद यांनी आपले सर्व नियम बाजूला ठेवून गुरुदेवांची भेट घेतली. योगी अरविंदांकडे पाहिल्यानंतर पहिल्याच दृष्टिक्षेपात गुरुदेवांना त्यांच्या उच्च अध्यात्मिक साधनेची जाणीव झाली. त्यांनी इतर योग्यांप्रमाणे आपल्या देहाला क्लेश दिले नव्हते तर त्यांच्या चेहऱ्यावर शांत आणि सौंदर्यपूर्ण असे हास्य आणि तेज विराजमान होते. एका योग्याची ती तेजस्वी मुद्रा होती. त्यांची ती आत्मसाक्षात्कारी अवस्था पाहिल्यानंतर गुरुदेवांनी त्यांना अरविंद रोबिंद्रेर लह नमस्कार ( हे अरविंदा, तुला रवींद्रचा नमस्कार असो ) असे मनातल्या मनात म्हटले आणि त्यांचा निरोप घेतला. योगी अरविंद गुरुदेवांच्या कवितांचे चाहते होते. त्यांनी गुरुदेवांना साक्षात्कारी कवी म्हटले आहे. स्वामी विवेकानंद योगी अरविंद आणि गुरुदेव रवींद्रनाथ टागोर या तिघांनाही हे माहिती होते की राजकारण हा काही मानवाच्या विकासाचा आणि कल्याणाचा मार्ग नाही माणूस घडवणे हे महत्त्वाचे आहे आज माणूस जाणिवेच्या ज्या पातळीवर उभा आहे त्यापेक्षाही अधिक पुढच्या पातळीवर किंवा पायरीवर गेल्याशिवाय त्याला पुढील गोष्टी नीट दिसणार नाही किंवा परिस्थितीचे योग्य आकलन होणार नाही याबाबत या तिघाही महामानवांचे एकमत होते असे दिसते. हेच त्यांचे मोठेपण आहे.

# स्वातंत्र्य : स्वतःचे

ज्योतिर्मय साहित्य

१५ ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून आपण साजरा करतो. एक वेगळाच उत्साह सगळ्या वातावरणात असतो. त्याचा सर्वांनी अनुभव घेतला आहे. पण माझ्या मनात वेगळेच विचार सुरु झाले. स्वातंत्र्य म्हणजे सत्ता बदल झाला. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. विचार, आचार, भावना, कृती याचे स्वातंत्र्य मिळाले. आणि काही वेगळी आव्हाने समोर उभी राहिली. ती भौतिक आव्हाने जरी अवघड वाटली तरी आपण त्यातून मार्ग काढू शकतो.

आपण खरेच स्वतःला स्वतंत्र करु शकतो का? स्वतःचे स्वातंत्र्य म्हणजे इतर कोणत्या व्यक्तींच्या पासून स्वतंत्र होणे नव्हे तर आपल्या मनातील विकार, नकारात्मक विचार, क्रोध, भीती, न्यूनगंड, भूतकाळातील वाईट अनुभव, जखमा आणि भविष्यातील चिंता या पासून मुक्त होणे. मानवी मनात सतत उलट सुलट विचार चालू असतात. आपल्याला कोणी आपले जुने अनुभव किंवा आठवणी विचारल्या



किंवा बोलण्याच्या ओघात आल्या तर त्या कटू किंवा वाईट आठवणी असतात. एखाद्या व्यक्ती विषयी सुद्धा बरेचदा चांगल्या आठवणी सांगितल्या जात नाहीत. या साठी मला एक अनुभव आठवतो. एकदा एका सरांनी वर्गात मोठ्या पांढऱ्या बोर्ड वर एक बारीक काळा ठिपका काढला त्यावेळी सर्वांचे लक्ष त्या छोट्या काळ्या बिंदू वरच जात होते. आणि जास्त असलेला पांढरा भाग मात्र दुर्लक्षित होत होता. असेच आपल्या मनाचे असते. आणि भविष्याचा विचार करताना चिंता जास्त वाटतात. या दोन्हीतून आपण स्वतःला स्वतंत्र करु शकलो, तरच मनाने खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ. आणि वर्तमानात राहू शकू. मात्र त्या साठी स्वतःसाठी स्वतःलाच प्रयत्न करावे लागणार आहेत.

या साठी आपल्याला आपल्या मनाशी मैत्री करावी लागणार आहे. आपण दुसऱ्यांशी मैत्री करण्यासाठी खुप वेगवेगळे प्रयत्न करतो. पण मन तर आपलेच असते कायम आपल्या बरोबर असते. आणि ते आपल्याला आरसा दाखवत असते. त्याच मनाशी होणारा संवाद आपल्याला बदलायचा आहे. आत्मभान ठेवायचे आहे. आत्मविश्वास वाढवायचा आहे. विविध नवीन गोष्टी शिकताना वेगळं बघण्याची व आत्मविश्वासाने जगण्याची क्षमता मिळवायची आहे.



विभावरी कुलकर्णी
८०८७८१०१९७

स्वतः इतरांचे अंधानुकरण करण्यापेक्षा सजग व्हायचे आहे. मनाची शिस्त कायम ठेवायची आहे. स्वतःमधील संवेदनशिलता जपायची आहे. अंतर्मुख व्हायचे आहे. अंतर्मुख झालो की, सृजनशील विचार, कल्पना शक्ती व सकारात्मकता वाढते. तरच आपण इतरांशी मोकळेपणाने संवाद साधू शकतो. आणि त्या मुळे बरेच मानसिक अडथळे दूर करु शकतो. हे सगळे समाजासाठी सुद्धा उपयुक्त असते.

अशा काही छोट्या छोट्या पण महत्वाच्या गोष्टी व बदल करुन आपण आपले मानसिक स्वातंत्र्य मिळवू शकतो. आंतरिक अडथळ्या पासून मुक्त होऊ शकतो. विचारशक्ती, भावना आणि कृती याचा उत्तम समतोल साधू शकतो. आणि हेच खरे मनाचे, श्वासाचे, आणि अस्तित्वाचे स्वातंत्र्य!

## डॉ प्रकाश आमटे यांना सत्यशोधक अण्णाभाऊ साठे जीवन गौरव पुरस्कार



ज्योतिर्मय साहित्य

**कराड –** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने मिळालेल्या पुरस्काराने नवीन ऊर्जा मिळाली असे प्रतिपादन लोकबिरादरी प्रकल्पाचे संस्थापक पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांनी केले. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा १०५ वा जयंती सोहळ्याचे निमित्ताने साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती महोत्सव समितीच्या वतीने समाजप्रबोधन व सन्मान सोहळा आयोजित केला होता. यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे यांना ॲड.संभाजीराव मोहिते यांच्या हस्ते शाल, मानपत्र व सन्मान चिन्ह,रोख रक्कम व फ ुले पगडीने ' सत्यशोधक अण्णाभाऊ साठे जीवन गौरव पुरस्कार २०२५' ने सन्मानित करण्यात आले.

यावेळी समितीचे संस्थापक निमंत्रक प्रकाश वायदंडे, स्वागताध्यक्ष रामभाऊ दाभाडे, दलित महासंघाचे अध्यक्ष प्रा.मच्छिंद्र सकटे, प्रा.डॉ.शरद गायकवाड, माजी नगरसेवक सौरभ पाटील, धनगर महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रविण काकडे, शिवानी मुंढेकर, प्रा.पै.अमोल साठे, गजानन सकट, जगन्नाथ चव्हाण, अमोल जाधव, पै.अक्षय सुर्वे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.प्रकाश आमटे म्हणाले, सामाजिक विषमतेच्या झळा सोसताना अण्णा भाऊंना शाळेच्या वर्गाबाहेर बसवले गेले. मात्र तरीही अत्यंत प्रतिकूलतेवर मात करुन शोषितांच्या वेदनांना साहित्यातून वाचा फोडत अण्णा भाऊ साठे यांनी जगभर नाव कमावले अशा स्फूर्तिदीप असलेल्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने मिळालेल्या पुरस्काराने मानवतेची ध्वजा ऊंचावण्यासाठी नविन ऊर्जा मिळाली.

विविध क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचाही यावेळी समाज गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये निवृत्त पोलीस अधिकारी बी.आर. पाटील, मराठी अभिनेत्री शिवानी मुंढेकर, सामाजिक कार्यकर्ते जावेद नायकवडी, डॉ.एम.बी पवार, कॉ. सुनील भिसे, वैशाली भोसले, वसंतराव पाटील, पै.किरण साठे, जगन्नाथ सोनावणे यांना समाज गौरव पुरस्काराने तर संवेदनशील कवी प्रकाश नाईक यांच्या 'या शकलांना सांधुया' या दीर्घ कवितेस प्रा. हरी नरके स्मृती साहित्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सुप्रसिद्ध कवी अनंत राऊत यांनी प्रबोधानत्मक कविता सादर केल्या.

प्रास्ताविक प्रमोद तोडकर यांनी तर, प्रा. दीपक तडाखे यांनी सूत्रसंचालन केले. हरिभाऊ बल्लाळ यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश सातपुते, राहूल वायदंडे, दत्ता भिसे ,सूरज घोलप, भास्कर तडाखे, कृष्णा लोखंडे, संजय तडाखे, कृष्णा लोखंडे, अण्णा पाटसुपे, संजय थोरात यांच्यासह समितीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.






# आधी वंदू तूझं मोरया...

## गणपती बाप्पा आले घरा.....॥

**ज्योतिर्मय साहित्य**

गणपती बाप्पा आले घरा घराचे मंदिर झाले बघा... मोरया मोरया गणपति बाप्पा मोरया, गणपती माझा नाचत आला, आला रे आला गणपती आला.. असा जयजयकार करून आपण आज गणपतीची स्थापना करत आहोत.

गणेश उत्सव हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा आणि लोकप्रिय असा सण आहे. दरवर्षी भाद्रपद महिन्यात शुक्ल चतुर्थीला गणेश उत्सवाची सुरुवात होते. या दिवशी श्री गणेशाची प्रतिष्ठापना करून दहा दिवसांच्या उत्सवाला प्रारंभ होतो. हा उत्सव केवळ धार्मिक उत्सव नसून सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय,आर्थिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा आहे.

गणेशोत्सव हा सर्वप्रथम धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. भगवान श्री गणेश हे बुद्धी, ज्ञान, समृद्धी आणि संकट अडथळे दूर करणारे देव मानले जातात. विघ्नहर्ता म्हणतात प्रत्येक शुभ कार्याच्या प्रारंभी गणपतीची पूजा केली जाते.

गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाची मूर्ती घरी किंवा सार्वजनिक ठिकाणी स्थापित करून विधिपूर्वक पूजा केली जाते. दहा दिवसांच्या उत्सवामध्ये रोज आरती, भक्तिगीते, स्तोत्रपठण आणि प्रसाद यांचा समावेश असतो. अनेक घरांमध्ये मंडळामध्ये पेढ्याचा मोदक तसेच उकडीचे मोदक आणि ओल्या नारळाचे मोदक करून गणपतीला २१, १०१, १००१ मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो. अनेक मंडळांमध्ये गणपती अथर्वशीर्ष चे सामूहिक पठण होत असते पुण्यामध्ये तर दगडूशेठ हलवाई गणपतीसमोर हजारो स्त्रिया ऋषिपंचमीच्या दिवशी सामूहिक अथर्वशीर्ष पठण करत असतात. श्री गणेशाच्या या पूजेमुळे लोकांमध्ये श्रद्धा, भक्ति आणि समर्पणाची भावना जागृत होते. गजानना श्री गणराया आधी वंदू तुज मोरया... दाता तू गणपती गजानना... गणराज रंगी नाचतो नाचतो... चिकमोत्याची माळ, होती ग तीस तोळ्याची ग... अशी गणपतीची सुंदर सुंदर गाणे या काळात आपल्या कानावर पडतात.

गणेश उत्सवाच्या निमित्ताने समाजात एकात्मता आणि बंधुभाव वाढतो. या उत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी लोक एकत्र येतात, एकमेकांना सहकार्य करतात आणि सामाजिक बंधनं मजबूत करतात. सार्वजनिक गणेशोत्सवांमध्ये मंडळं, समाजाचे विविध घटक एकत्र येऊन गणेश मूर्तीची स्थापना करतात. एकत्रितपणे होणाऱ्या या उत्सवामुळे समाजात एकात्मता आणि आपुलकीची भावना वाढीस लागते. लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, सर्वजण या उत्सवात एकत्र सहभागी होतात आणि समानतेचा संदेश देतात.

धर्मिक महत्त्वासोबतच सांस्कृतिक महत्त्वही तेवढेच आहे.

गणेश उत्सव हा सांस्कृतिक महोत्सव म्हणूनही महत्त्वाचा आहे. या उत्सवाच्या दरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, गायन, नाटकं आणि स्पर्धा आयोजित केल्या जातात. निरनिराळे देखावे करून आरास केली जाते. या कार्यक्रमांमधून भारतीय संस्कृतीचे विविध पैलू, कला आणि परंपरांचा प्रचार आणि प्रसार होतो. अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालयं आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. यामुळे नवोदित कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी मिळते आणि संस्कृतीचे संवर्धन होते.

हे सर्व साजरे करत असताना पर्यावरणाचा समतोल राखून प्रदूषण निर्माण होणार नाही याबाबतीतही लक्ष देणे तेवढेच आवश्यक आहे.

गणेश उत्सवाच्या काळात पर्यावरणाशी संबंधित समस्या देखील वाढत आहेत. आरोग्याला घातक रंगाचा वापर, घातक प्लास्टिक प्लास्टिकची फुले,निर्माल्य, परंतु सध्या पर्यावरण संरक्षणाची जागरूकता वाढली आहे आणि यासाठी अनेक उपाययोजना केल्या जात आहेत. गणेश मूर्तींमध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी मातीच्या मूर्तींचा वापर, नद्यांमधील प्रदूषण टाळण्यासाठी कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर, नैसर्गिक रंगांचं महत्त्व आणि गणेशोत्सवाच्या काळात प्लास्टिकमुक्त वातावरणाची गरज यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा केली जाते. त्यामुळे गणेश उत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्याचं महत्त्व लोकांमध्ये रुजत आहे. तरीही अजून सुधारण्याला भरपूर वाव आहे असे म्हणावे लागेल.

गणेश उत्सवाच्या काळात लोककला आणि हस्तकलांच्या प्रचाराचा एक महत्त्वाचा कालखंड असतो. गणेशाच्या मूर्ती तयार करणारे कलाकार, पारंपारिक शिल्पकला, चित्रकला आणि विविध हस्तकलांचा विकास होतो. गणेश मूर्तींमध्ये विविध पारंपारिक पद्धतींनी केलेली कारागिरी पाहायला मिळते. यामुळे लोककला आणि हस्तकला यांचा विकास होऊन त्या कलेत गुंतलेल्या कारागिरांना रोजगाराची संधी मिळते. आणि लोककला आणि हस्तकला यांचेही संवर्धन होत असल्याचे आपणास दिसते.



गणेश उत्सवाच्या काळात महिला देखील विविध कार्यक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होतात. महिला मंडळं उत्सवाचं आयोजन, सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी स्पर्धा, पाककला स्पर्धा इत्यादीतून आपले कौशल्य दाखवतात. यामुळे महिलांना समाजात सन्मान मिळतो आणि त्यांचं सक्षमीकरण होतं. सार्वजनिक गणेशोत्सवांमध्येही महिलांना महत्त्वाची भूमिका दिली जाते, ज्यामुळे महिलांच्या सहभागाचं महत्त्व अधोरेखित होतं. आता गणपतीच्या मिरवणुकीमध्ये मुलींच्या ढोल ताशा पथकाचा समावेश असतो ही खूप उल्लेखनीय बाब आहे त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास ही वाढतो.खंबीरपणा येतो.




गणेश उत्सवाचा आर्थिक परिणामही महत्त्वाचा आहे. या उत्सवाच्या काळात बाजारपेठेत विविध वस्तूंची मागणी वाढते. गणेश मूर्ती, सजावट साहित्य, पूजा साहित्य, वस्त्र, फळं, मिठाई, आणि इतर वस्तूंच्या विक्रीत वाढ होते. यामुळे अनेकांना रोजगाराची संधी मिळते. विशेषतः हस्तकला, मूर्तीकला आणि वस्त्रउद्योग यांना चालना मिळते. यामुळे स्थानिक व्यवसायिकांना फायदा होतो आणि अर्थव्यवस्थेत योगदान मिळतं.

गणेश उत्सवात शैक्षणिक महत्त्वही आहे. गणेश उत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि इतिहासाबद्दल माहिती मिळते. शाळांमध्ये गणेशोत्सव साजरा केल्याने विद्यार्थ्यांमध्ये एकात्मतेची भावना वाढते. विविध स्पर्धांमधून विद्यार्थी आपले कौशल्य दाखवतात. त्याचप्रमाणे गणेशाच्या उपदेशांवर आधारित शैक्षणिक संदेश दिले जातात, व्याख्यानमाला आयोजित केल्या जातात ज्यामुळे विद्यार्थ्यांना चांगले विचार, संस्कार मिळतात.

गणेश उत्सवाच्या काळात आधुनिकतेचा आणि पारंपारिकतेचा संगम पाहायला मिळतो. काही ठिकाणी आधुनिक संगीत, डीजे, लेझर लाईट शो यांचा समावेश असतो, तर काही ठिकाणी पारंपारिक नृत्य, गायन आणि वाद्य संगीताचे कार्यक्रम असतात. यामुळे पारंपारिकतेला सन्मान दिला जातो, तसेच आधुनिकता स्वीकारून उत्सव अधिक आकर्षक बनतो. परंतु सध्या डीजे लेझर लाइटिंग शो ह्याचा अतिरेक झाल्यामुळे अनेक वाईट गोष्टी घडतात त्याच्या प्रकाश, आवाजामुळे कर्णबधिरता येणे, हार्ट अटॅक येणे, लहान मुलांना, रुग्णांना त्रास होणे, अंधत्व येणे अशा अनेक गोष्टी घडतात की त्यामुळे आता बरेच गणेश मंडळांनी त्याचा वापर बंद केला आहे. परंतु अशी फार कमी मंडळ आहेत. त्यामुळे त्याच्यावर बंदी सुद्धा आणली गेली होती. आता तर गणेशोत्सव राज्याचा महोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे, त्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे. सर्वांनीच हा गणेशोत्सव यशस्वी करायचा आहे आणि ती जबाबदारी ही शासनासोबत गणेश मंडळाची आणि सर्व जनतेही आहे हे लक्षात ठेवायला हवे. गणेशोत्सवाच्या काळात गावोगावी एक चांगले वातावरण निर्माण झाले असते. अगदी लहान लहान खेडेगावापासून तर अगदी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, सर्व ठिकाणी हा उत्सव अतिशय आनंदात आणि उत्साहात साजरा होत असतो. पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपती, राजूरचा गणपती, तसेच जळगाव जिल्ह्यातील पद्मालय येथील गणपती, ठाणे जिल्ह्यातील टिटवाळा येथील गणपती, यवतमाळ जिल्ह्यातील कळंबचा गणपती, नागपूरचा टेकडी गणपती, सांगलीचा पटवर्धन बागेतील गणपती, मुंबईचा सिद्धीविनायक गणपती, लालबागचा गणपती, पुण्यातील कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरुजी तालीम गणपती, तुळशीबाग गणपती, मंडई गणपती, जिलब्या मारुती मंडळाचा गणपती, केसरी वाडा गणपती, भाऊसाहेब रंगारी गणपती. सारसबाग गणपती, अशी अनेक प्रसिद्ध गणपती मंदिरे महाराष्ट्रात आहेत.

गणेश उत्सव हा केवळ धार्मिक सण नसून त्याचा सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण, आर्थिक आणि शैक्षणिक महत्त्व आहे. या उत्सवामुळे समाजात एकात्मता, समर्पण आणि सद्भावना वाढीस लागते. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करून आपण पर्यावरणाचं संरक्षण करू शकतो. तसेच, सांस्कृतिक आणि पारंपारिकतेचं जतन करणे आणि आधुनिकतेचा स्वीकार करून उत्सव अधिक समृद्ध करणे हे आपल्या हातात आहे. गणेश उत्सव साजरा करताना त्याच्या विविध पैलूंना सन्मान देऊन आपण एक समृद्ध आणि सशक्त समाज निर्माण करू शकतो. एका मोठ्या विचाराने लोकमान्य टिळकांनी, भाऊसाहेब रंगारी यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले ते आपण टिकवायला हवे. अनेक वाईट अप्रिय घटना समाजात घडताहेत त्या कुठेतरी बंद व्हायला हव्यात.

गजाननाचे आगमन होत आहे तेव्हा आपण आपल्या देशात शांतता नांदावी, एकमेकात बंधुभाव निर्माण व्हावा, देशभक्ती वाढीस लागावी, आपली संस्कृतीचा जोपासना व्हावी. या देशात पोशिंदा म्हणतो त्या बळीराजाला चांगले दिवस यावे,तरुणांच्या हाताला काम मिळावे म्हणून प्रार्थना करूया. तेव्हा आमची प्रार्थना ऐकून घे रे बा गजानना !!!

## गणेशोत्सवात विधायक कामे करावीत

**ज्योतिर्मय साहित्य**

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करुन शतकोत्तर रौप्य महोत्सव उलटला आहे. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे


गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली भक्तांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेंब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. गणेश मंडळांनी रक्तदान शिबिर आयोजित करावीत. दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत करावी तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य , निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.

***

## संस्थान गणपती राजा बाजार. !

**ज्योतिर्मय साहित्य**

संस्थान गणपतीचे पूर्वी छोटेसे मंदिर होते .१९८५ पासून या मंदिराचा जिर्णोद्धार सुरू करून १९८८ मध्ये संस्थान गणपतीची पुनर्रप्रतिष्ठापना करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर मधील सर्व लोकांची अपार श्रद्धा असणारं हे संस्थान गणपती मंदिर आहे.मंदिरातील गणेशाची मूर्ती दोन फ ूट उंचीची असून स्वयंभू स्वरूपाची आहे. ओंकार स्वरूपी शेंदूर वर्णीय हा गणेश आहे १९८८ साली जीर्णोद्धार झाल्यानंतर संपूर्ण मंदिर हे संगमरवरी पद्धतीने बांधण्यात आलं. मंदिराची उंची २५ फूट तर रुंदी ९० फूट आहे.



छत्रपती संभाजीनगर वासियांचे आराध्य दैवत म्हणून ओळखणाऱ्या असणाऱ्या संस्थान गणपती मंदिरात रोज नित्य नियमाने पूजा.. अर्चा.. नैवेद्य ..आरती.. मंत्र घोष अथर्वशीर्षाची आवर्तने.. अभिषेक असे धार्मिक विधी होत असतात. हे मंदिरातील मुख्य पुजाऱ्यांनी आम्हांस सांगितले. दहा दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवात रोज हजारो भक्तगण आपल्या आवडत्या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी येतात.. ते का अंतरीक ओढीने. गणरायाचा दहा दिवस चालणारा हा गणेशोत्सव म्हणजे हजारो वारकरी ज्या प्रेमाने पांडुरंगाच्या दर्शनासाठी दुर दुरून पंढरीस येतात त्याच भक्ती भावाने छत्रपती संभाजीनगर मधील प्रत्येकजण संस्थान गणपतीच्या दर्शनाच्या ओढीने येत असतात .प्रत्येकाच्या हृदयात भक्ति रूपाने वसलेला संस्थान गणपती संभाजीनगरचा हा गणाधिपती आहे .म्हणूनच गणरायाच्या या मिरवणुकी देखील या मंदिरापासूनच ती मिरवणूक सुरू होते. गणेश महासंघाच्या मान्यवराकडून गणेशाची प्रतिष्ठापना करताना देखील संसद गणपतीलाच हा मान दिलेला आहे.




गणेशोत्सवाच्या दहा दिवस चालणाऱ्या या उत्सवात भक्तगणांना भोजन देण्याची परंपरा मंदिराच्या विश्वस्तांनी सुरू केलेली आहे ती आजही सुरू असते. रोज दहा हजाराहून अधिक लोकांना मंदिर समितीकडून हे अन्नदान केले जाते. मग तृप्त झालेले सर्व भक्तगण एका आत्मिक श्रद्धेने प्रसाद घेऊन आपापल्या घरी परततात.

संस्थान गणपतीच्या माध्यमातून सामाजिक संस्थांना खूप मोठी मदत केली जाते. अनेक गरीब होतकरू मुलांनाही मदत दिली जाते. गरजू गरीब आजारी रुग्णांनाही मदतीचा हात मंदिराच्या समितीच्या माध्यमातून दिला जातो. त्याचबरोबर होतकरू खेळाडूंना महिलांना मुलांना देखील आजपर्यंत गणपतीच्या समितीच्या माध्यमातून खूप मोलाची मदत केलेली आहे. अनेक गरजू गरीब लोकांसाठी मोफत एक रुग्णालय देखील सुरू करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर गरीबविद्यार्थ्यांसाठी मोफत वाचनालय देखील सुरू करण्यात आलेले आहे. भविष्यामध्ये मोठे मंगल कार्यालय उभे करून गरीब लोकांना अगदी नाममात्र दरात त्यांची मंगल कार्याची सोय आम्ही करणार आहोत असे मंदिर मंदिराच्या पदाधिकाऱ्यांनी आम्हास सांगितले. भक्तगणांची अपार श्रद्धा असलेल्या या संस्था गणपतीचे रूप काय वर्णवे.. सोन्याचा रत्नजडित माथ्यावर लखलखणारा तो मुगुट.. गळ्यात रत्नांचे मानकांचे अगणित अलंकार.. पायात मडवलेले अलौकिक तोडे.. अशा सुवर्ण अलंकाराने सजलेले गणेशाचं संस्थान गणपतीचे हे नयन मनोहर रूप पाहून भक्तगण भारावून जातात. एकात्मिक समाधानाने तृप्त होऊन जातात.. हे रूप हृदयामध्ये सामावून घेऊन आपलं जीवन कृतार्थ झालेलं आहे या भावनेने भावनेने त्यांची पावले आपल्या घराकडे परततात....

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559